# प्रेम धवन - भाग १



प्रेम धवन हे एक सुसंस्कृत आणि सह्रदय असे उमेद व्यक्तिमत्त्व होते. दुर्दैवाने ७ मे २००१ रोजी मुंबईच्या जसलोक हॉस्पिटलमध्ये त्यांचे निधन झाले. ते तेव्हा शहात्तर वर्षांचे होते. पुढे दिलेली त्यांची मुलाखत ही त्यांच्या मृत्यूपूर्वी काही महिने अगोदर घेतलेली होती.

जिन्हे जमाने ने सब कुछ दिया है, गम के सिवा
जहाँ मे ऐसे भी कुछ बदनसीब होते है

दिलोंके रिश्ते बहुत ही अजीब होते है
जो दूर हो वोही करीब होते है

उतार लेते है दिल मे जो नोक काँटों की
उन्ही को फूल चमन के नसीब होते है

(एका अप्रदर्शित चित्रपटासाठी केलेले हे गीत आहे)

त्यांच्याबद्दल सदैव आदरानेच बोलले जात असे. सभ्य आणि सुसंस्कृत, व्यवस्थित टापटिपीचा, बोलण्यात गोडवा असलेला आणि स्वत:बद्दल कुठलाही आविर्भाव न बाळगणारा असे त्यांचे सार्थ वर्णन करता येईल. ते हसतमुख होते आणि त्यांची विनोदबुध्दी जबरदस्त होती. त्यांनी चाळीस वर्षे

हिंदी चित्रपटांसाठी फारच सुरेख अशी गीते लिहिली. त्यांच्याकडे बोलण्याची कला चांगली होतीच पण ते श्रोता म्हणूनही चांगले होते. खरे तर चित्रपटसृष्टीत दुसऱ्याची बाजू ऐकायची फारशी पध्दत नसताना ते दुसऱ्याचे बोलणेही मन लावून ऐकत. जवळ जवळ अर्धा डझन भाषाही त्यांना अवगत होत्या.

त्यांची आर्थिक बाजूही फार चांगली होती आणि ते एका बिल्डिंगच्या सर्वांत वरच्या मजल्यावरील मोठ्या अपार्टमेंट मध्ये, व्यवस्थित अभिरूचीने सजवलेल्या घरात रहात असत. घराची अंतर्गत सजावट स्वप्नवत अशीच होती. एवढेच नव्हे तर त्यांच्या या घरातून नेपियन सी रोडवरील प्रियदर्शिनी पार्कच्या हिरवळीचा नयनरम्य असा मोठा भाग दृष्टीपथात येत असे. आणि या पार्कपलिकडे असलेला अथांग सागर (बहुतेक लेखकांचे स्वप्न असते) तोही होताच आणि त्याच्याकडून त्यांना भरपूर स्फूर्तीही मिळत होती.

मी त्यांची मुलाखत घेण्यासाठी त्यांच्या घरी गेलो होतो आणि त्यांची आंघोळ आटपेपर्यंत मी अंगातील फॅट कमी करण्यासाठी धावणाऱ्या जॉगर्सना गॅलरीतून खाली पाहत होतो. त्यांचे ते परिश्रम पाहून माझ्या मनात एक गंमतीशीर गोष्ट आली, ती म्हणजे सुरुवातीला कित्येक वर्षे इतर अनेक गीतकारांसारखे प्रेम धवन हेही एखादे उत्कृष्ट गीत किंवा गझल तयार करण्यासाठी तन-मन-धन एकत्र करून खूपच परिश्रम घेत असणार ! आता मात्र हा गीतलेखक त्या अवस्थेच्या खूपच पलिकडे पोहोचला आहे. आता त्यांना अशी धावपळ करावी लागत नाही. आता ते केवळ स्वत:च्या आनंदासाठी जगतात.

आमची मुलाखत आता सुरू होतेय. ती आहे पुढीलप्रमाणे -

प्रेम धवन - माझी अशी समजूत झाली होती की आजच्या काळात लोकांना जुनी गाणी फारशी आवडत नसावीत. परंतु जेव्हा कधी मी जुन्या गाण्यांच्या कार्यक्रमाला जातो, तेव्हा मी भारावून जातो. माझ्या माहितीत कितीतरी डॉक्टर्स असे आहेत की ते सोम ते शनि आपला दवाखाना इमाने इतबारे सांभाळतात पण रविवारी मात्र जुन्या गाण्यांचा आस्वाद घेण्यात आनंद मिळवतात. माझ्या ओळखीत एक इन्कमटॅक्स कमिशनर आहे. तो मला म्हणाला की त्याचे काम इतके ताण तणावाचे असते की त्याला ह्या जुन्या गाण्यांतून विरंगुळा मिळतो, ताणमुक्त होता येते.

प्रश्न - पण तुमच्यासारखे संगीतात आकंठ बुडालेले लोक विरंगुळ्यासाठी काय करतात ? तुम्ही काय इन्कमटॅक्स संबंधी थोडाच विचार करणार ? तुमच्या बरोबरचे राजिन्दर किशन साहेब त्यांचा बराच वेळ इन्कमटॅक्स संबंधीची पुस्तके वाचून घालवायचे. परंतु अर्थातच ते काम काही मनोरंजन करणारे

नक्कीच नाही.

प्रेम धवन - पूर्वी माझे एखादे गीत माझ्याकडून मनासारखे पूर्ण झाले की मला मोकळेपणाचा आनंद मिळायचा. अपत्यजन्मासारखा तो आनंद असायचा ! आता मी खूप वाचन करतो. मला त्यातून आनंद मिळतो. पूर्वी मला त्यासाठी वेळच मिळत नसे.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com